

नोंदणी क्र. ए-६३५/१९६७, (अहमदनगर)

# श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे

( श्रीक्षेत्र मोहटादेवी )

ता.पाथर्डी, जि.अहमदनगर पिन -४१४ १०२

**Email :- jagdambadevi@gmail.com**

*****

# निवीदा फॉर्म

## कामाचे नांव

***दि.१०.०९.२०२६ ते पुढील आदेशापर्यंत श्रीक्षेत्र मोहटादेवी गडावर भाविक भक्तांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेकामी १०००० लि. वा त्यापेक्षा अधिक क्षमतेचे खाजगी टँकरने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेबाबत.***

**जाहिर निवीदा - टँकरव्दारे पिण्याचे पाणीपुरवठा करणेबाबत**

श्री जगदंबा देवीसार्वजनिक ट्रस्ट,मोहटे ता.पाथर्डी, जि.अहमदनगर संस्थानकरिता दि.१०.०९.२०२६ ते पुढील आदेशापर्यंतच्या कालावधीकरिता देवीगडावर, इतर ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी इच्छुक टँकर मालकांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. यशस्वी निवीदा धारकांस टँकर क्षमतेप्रमाणे देवस्थानच्या मागणीप्रमाणे आवश्यक खेपांव्दारे देवीगडावर पाणीपुरवठा करावा लागेल.

**१**.निवीदा भरणेचा कालावधी - **दि. ३१.०८.२०२६ पासून ते दि. ०८.०९.२०२६ रोजी सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत.**

**२.**निविदेच्या अटी, शर्तींबाबतचा निवीदा फॉर्म- श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे संस्थानच्या कार्यालयात तसेच संकेतस्थळ www.shrimohatadevi.org वर उपलब्ध आहे.

**३**.निवीदेची विक्री किंमत - रू. ५००/- ( संकेतस्थळावरून निवीदा डाऊनलोड केल्यास रू. ५००/- देवस्थानकडे रोखीने अथवा ऑनलाईन पध्दतीने जमा करावे,पावती सोबत जोडावी.)

**४.बयाना रक्कम -** निवीदा बयाणा रक्कम रू. ५,०००/- ( रूपये पाच हजार मात्र ) सदर रक्कम रोख, धनाकर्ष अथवा ऑनलाईन पध्दतीने भरणा करावी. भरणा पावती, तपशील इत्यादी निवीदा फॉर्म सोबत जोडण्यात यावा.

**५**.निविदा उघडणे प्रक्रियाकामी दिनांक व वेळ कळवण्यात येईल. सदर दिवशी निवीदाधारक / प्रतिनिधी यांनी हजर रहावे. वेळ, दिनांक, स्थळामध्ये बदल झाल्यास याबाबतची सुचना देवस्थानचे नोटीस बोर्ड प्रसिध्द करण्यात येईल.

**६**.कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे किंवा निविदेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे अधिकार संस्थानने राखून ठेवले आहेत.

**दि. ३०.०८.२०२६** **मुख्य कार्यकारी अधिकारी**

**जाहिरात क्र. १८ / २०२६** श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे

# श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे

ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर.

**पिण्याचे पाणी वाहतुक निविदा प्रक्रिया सुचना व अटी, शर्ती**

श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट, मोहटे ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर संस्थानकरिता दि.१० सप्टेंबर २०२६ ते पुढील आदेशापर्यंतच्या कालावधीकरता देवीगडावर पाण्याचा पुरवठा करण्यासाठी टँकर मालकांकडून निवीदा मागविण्यात येत आहेत. निवड होणाऱ्या टँकर मालकास आवश्यकतेप्रमाणे देवीगडावर पाणीपुरवठा करावा लागेल. ( टँकरची क्षमता किमान १०००० लिटर किंवा त्यापुढील असावी.)

१. **निवीदा मिळण्याचे ठिकाण -**www.shrimohatadevi.org या संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. सदर निवीदा संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घेता येईल. तसेच देवस्थानच्या कार्यालयामध्ये दि. ०८.०९.२०२६रोजी ०३.०० वाजेपर्यंत विक्रीकरिता उपलब्ध असतील.

२. **निवीदा फॉर्म प्राप्त करणेची पध्दत व फी -** निवीदा फॉर्म संकेतस्थळ किंवा देवस्थान कार्यालयातून रू.५००/- ( पाचशे मात्र ) रक्कमेस मिळेल. संकेतस्थळावरून निवीदा फॉर्म डाऊनलोड केल्यास त्यांची फी रू.५००/- ( पाचशे मात्र ) धनाकर्षाव्दारे निवीदा फॉर्मसोबत जोडणे बंधनकारक राहील. तसेच देवस्थान कार्यालयातून समक्ष नेल्यास रोखीने फी भरणा करावा लागेल.

३. **निवीदेसोबत अनामत रक्कम ( बयाणा रक्कम )-** निवीदा फॉर्मसोबत स्वतंत्र पाकीटामध्ये श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट, मोहटे संस्थानचे नांवे पाथर्डी येथे देय असणारा रू.५०००/- ( रूपये पाच हजार मात्र ) धनाकर्षाव्दारे जमा करावा. अनामत रक्कम नसलेली निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

४. **निवीदाहार्ड कॉपी स्विकारण्याची अंतिम दिनांक व वेळ :-**

दि. ०८.०९.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत देवस्थान कार्यालयामध्ये स्विकारण्यात येतील.

५. **निवीदासादर करण्याची पध्दती**

१. सदर निवीदा दोन लिफाफे पध्दतीने (व्दीलिफाफा )सादर करावी लागेल.

२. लिफाफा क्र.१ हा तांत्रिक लिफाफा असेल. निवीदा फॉर्म भरून निवीदेच्या प्रत्येक पानावर

( फॉर्मवर ) सही / शिक्का ( असल्यास) केलेलीनिवीदा, अनुभव प्रमाणपत्र, निवीदेतील सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणारा लिफाफा राहील.

३. लिफाफा क्र.२ मध्ये निवीदा फॉर्म फि पावती, बयाणा रक्कम धनाकर्ष, दरपत्रक आदि राहील.

४. सिलबंद लिफाफ्यांवर **<u>पाणीपुरवठा टँकरवाहतुक निविदा</u>** असे नमूद करावे.

**६. निवीदेसमवेत सादर करावयाची कागदपत्रे.**

१. निवीदा फॉर्म डाऊनलोड केला असल्यास त्यांचा निविदा फॉर्म फीचा धनाकर्ष व बयाणा रक्कम धनाकर्ष अथवा रोख रक्कम अथवा ऑनलाईन भरण्याची पावतीची प्रत जमा केल्याची पावती.

२. आधार, पॅनकार्डची साक्षांकित प्रत.

३. स्वतःचे मालकीच्या टँकरसंबंधी रोड टॅक्स, विमा, फिटनेस, परमिट, नोंदणी प्रमाणपत्र, पी.यु.सी. व व्यवसाय कर इत्यादीबाबत पूर्तता करीत असल्यासंबंधी टँकरचे नंबर नमूद करून सर्व स्वसाक्षांकींत प्रती.

**संस्था असल्यास जोडावयाची आवश्यक कागदपत्रे ( क्र. ४ ते १७ )**

४. निवीदाधारक हा - संस्था प्रोप्रायटरशिप, पार्टनरशिप, प्रायव्हेट लिमिटेड, पब्लिक लिमिटेड, सहकारीसंस्था इत्यादी ज्या प्रकारची असेल त्याप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याकडे तिची नोंदणी केल्याचे नोंदणी प्रमाणपत्र.

५. संस्थेची नियमावली ( बायलॉज ) ची साक्षांकिंत प्रत.

६. संस्थेच्या उलाढालीचा व रोख भांडवलाचा तपशिलासंबंधी पुरावे.

७. सनदी लेखापाल अथवा वैधानिक लेखापरिक्षण अधिकारी यांनी प्रमाणित केलेला मागील तीन वर्षाचा ताळेबंद ( बॅलन्सशिट )

८. मागील तीन वर्षांच्या आयकर परताव्याच्या साक्षांकिंत प्रती.

९. मागील एकवर्षाचे बँक पासबुकची साक्षंकिंत प्रत.

१०.संस्थेच्या गुंतवणूक क्षमतेबाबत प्रमाणपत्र.

११.निवीदाधारक संस्थाने रोख भांडवलाबाबतचा तपशिल ( बँक बॅलन्स /एफडी) जोडावा.

१२.संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेबाबत अन्य पूरावे.

१३.संस्थेविरूध्द अगर तिच्या मालकांविरूध्द अथवा संचालकांविरूध्द आर्थिक अफरातफरीचे अगर फसवणूकीसंबंधी गुन्हे दाखल नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र.

१४.संस्था मागणीप्रमाणे टँकर पूरविणेत समर्थ असलेबाबत संस्थेचे हमी पत्र.

१५.निवीदाधारक, संस्था टँकर पूरवठ्याचे काम करण्यास तयार असलेबाबत तसेच त्याअनुषंगाने होणाऱ्या दायित्वास संपूर्ण जबाबदार राहील अशा आशयाचा संस्थेच्या सर्व संचालकांच्या स्वाक्षरीचा ठराव.

१६.यापूर्वी टँकरव्दारे पाणी पुरवठा केला असल्यास तसा अनुभवाचा दाखला

१७.निवीदाधारकसंस्थेची परिपूर्ण भरलेली माहिती.

**निवीदेतील अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.**

१. निविदा उघडणे प्रक्रियाकामी दिनांक व वेळ कळविण्यात येईल. सदरदिवशी निवीदाधारक / प्रतिनिधी यांनी हजर रहावे. दिनांक, वेळेमध्ये बदल झाल्यास याबाबतची सुचना देवस्थानचे नोटीस बोर्ड प्रसिध्द करण्यात येईल.
२. कामाचा अंदाजित कालावधी दि.१० सप्टेंबर २०२६ ते पुढील आदेशापर्यंत राहील. यामध्ये आवश्यकतेप्रमाणे वाढ अथवा कालावधी कमी करण्याचा अधिकार देवस्थानने राखून ठेवलेला आहे. ती सर्व लिलावधारकांवर बंधनकारक असेल.
३. वाहन टाकीसह सुस्थितीत व पिण्याच्या पाण्याची सुरक्षित वाहतुक करण्यास योग्य असणे आवश्यक आहे.
४. निवीदेतील लिफाफा क्र.२ मध्ये टँकरची मे.टनामधील पाण्याचे **वजनाची काटा पावती**, प्रत्येक टँकरचे क्षमतेप्रमाणे मासिक भाडे तसेच प्रति कीमी इंधनभाव ( डिझेलची ) रक्कम नमुद करावी. उद्भव ते मोहटादेवीगड असे स्वतंत्र निव्वळ पाण्याचे टनामधील वजन ( वाहतुकीसह ) प्रति खेपेचे दर नमूद करावे. यशस्वी निवीदाधारकास आवश्यकतेप्रमाणे टँकर्स पूरवठा करणे बंधनकारक राहील. सदरचे दर हे सर्वसमावेशक असावेत, टँकर भराईचा खर्च देवस्थानामार्फत अदा केला जाईल. दररोज प्रत्येक टँकरला दोन खेपा करणे बंधनकारक असले त्याच दिवशी दोन खेपा होवू न शकल्यास दुसरे दिवशी अतिरिक्त खेप द्यावी लागेल.
५. टँकर पूरवठा करण्याचे आदेश दिल्यानंतर यशस्वी निवीदाधारकास टँकरसंबंधीत टँकरचे किलोमीटर रिडींगघेणेत येईल, टँकर बद करण्याचे आदेश झालेनंतर टँकरचे मीटर रिडींग द्यावे लागेल.
६. यशस्वी निविदाधारकास त्यांनी पूरवठा केलेल्या टँकरलाठरवून देण्यात आलेल्या दैनिक खेपा करणे बंधनकारक राहील. ( किमान दोन )
७. प्रत्येक टँकरच्या प्रमाणित क्षमतेनूसार प्रती खेपेचे भाडे आवश्यक ती पडताळणी केल्यानंतर अदा करण्यात येईल. यशस्वी निवीदाधारकास दर महिण्याला म्हणजे दर महिण्याच्या ५ तारखेच्या आतमध्ये देयक सादर करावे लागेल.
८. टँकरवर काम करणाऱ्या कर्मचारी यांचे ( अधिकृत वाहनचालक, व मदतनिस ) वेतन व भत्ते तसेच टँकरसाठी लागणारे तेल, इंधन व इतरखर्च वाहन मालकानेच स्वतः अदा करावयाचे आहेत, यासाठी निवीदाधारकाने स्वतंत्र व्यवस्था करावी. याकरिता देवस्थान जबाबदार राहणार नाही.

९. यशस्वी निवीदाधारकास किंवा त्यांनी पुरवठा केलेल्या टँकरला कोणतीही आगाऊ रक्कम दिली जाणार नाही. त्याचप्रमाणे देवस्थानमार्फत इंधन पुरवठा केला जाणार नाही.

१०. यशस्वी निवीदीधारकास ठरवून दिलेल्या मुदतीत कार्यक्षमतेने व करारनाम्यातील अटी व शर्ती प्रमाणे काम करणे बंधनकारक राहील. अन्यथा त्याची निवीदारद्द करणेत येईल व बयाणा रक्कम जप्त करणेत येईल, काळ्या यादीत टाकण्यात येईल. अथवा एल-२ निविदाधारकांकडून सदर सेवा घेण्यात येईल.

११. संस्थानमार्फत निश्चित करण्यात आलेल्या ठिकाणाहून किंवा वेळोवेळी दिलेल्या लेखी निर्देशानुसारच्या ठिकाणाहून पिण्याच्या पाण्याची वाहतूक करावी लागेल.

१२. शासन नियमाप्रमाणे बिलातून आयकर व त्यावरील सरचार्ज कापून घेणेत येईल. आयकर खात्याने आयकर अथवा व्याजाची किंवा दोन्हीही मागणी केल्यास त्याची भरपाई निवीदाधाकास करावी लागेल.

१३. पाणी वाहतुक कालावधी दरम्यान टँकरचा देखभाल व दुरूस्तीखर्च हा टँकर मालकांस करावा लागेल, टॅकर नादुरूस्त झाल्यास त्याची दुरूस्ती तात्काळ करण्यात येवून पाणी वाहतूकीत कुठल्याही प्रकारचा खंड पडता कामा नये. आवश्यकतेप्रमाणे पर्यायी टँकर उपलब्ध करून द्यावा लागेल.

१४. टँकरचे वाहन चालक हे प्रशिक्षित, कार्यक्षम कुशलव अनुभवी ठेवावेत. तसेच त्यांचे कडेस शासनाच्या नियमाप्रमाणे जडवाहन्‍ ाचालविणेचा चालु स्थितीतील परवाना आवश्यक आहे. त्यांनी कुठल्याही प्रकारची नशा, गैरवर्तन करू नये.

१५. टँकरला कुठल्याही प्रकारचा अपघात झाल्यास व वाहनाने कोणत्याही प्रकारचे नुकसान केल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी यशस्वी निविदाधारकांची / टँकरचालक व टँकर मालकाची राहील, याबाबत देवस्थानची कोणतेही जबाबदारी राहणार नाही. त्यासाठी संस्थानकडून कोणताही मोबदला / नुकसान भरपाई दिली जाणार नाही याबाबत संस्थान विरोधात नुकसान भरपाईचा दावा करता येणार नाही.

१६. टँकरव्दारे पाणीपुरवठा निवीदा कालावधीत यशस्वी निविदाधारकाने इतर कोणत्याही व्यक्ती / संस्थेशी केलेला करार / खाजगी व्यवहाराची संपूर्ण जबाबदारी निविदाधारकाची / ठेकेदाराची राहील.

१७.	पाणी वाहतुकीसाठी पुरविलेल्या टँकरचे स्पिडोमीटर सुस्थितीत ठेवणे ही जबाबदारी यशस्वी निवीदाधारक यांची राहील. मागणीप्रमाणे त्याचा डेटा देवस्थानास देणे बंधनकारक असेल. लॉग बुक अदयावत नोंदीसह ठेवणे बंधनकारक असेल.

१८.	पिण्याचे पाणी वाहतुकीचा कालावधी या कार्यालयाचे आदेश दिले पासून ते पुढील आदेशापर्यंत असेल.

१९.	निवीदेमध्ये नमूद केलेल्या दर सर्वसमावेशक असावेत. त्याबाबत इतर कोणतीहीवेगळी भरपाई दिली जाणार नाही. मंजूर झालेल्या निवीदेतील दरामध्ये वाढ केली जाणार नाही.

२०.	टँकर वाहनाचे शासनाच्या नियमाप्रमाणे पासिंग व इतर आवश्यक बाबींची पुर्तता केलेली असावी. वाहनांचा व वाहनातील चालक, मदतनीस व कायद्याप्रमाणे आवश्यक विमा असावा.

२१.	निवीदा मंजूर झाल्यानंतर निवीदा धारकांस टँकरवर - **श्री जगदंबा देवीसार्वजनिक ट्रस्ट,मोहटे पाणी पुरवठा योजना**, **व वाहतुक कालावधी , उदभव ठिकाण**अशा माहितीचा बोर्डठळक अक्षरात टँकरच्या दर्शनी भागावर लावावा लागेल.

२२.	टँकरची लॉगबुक एक प्रतित ठेवावे लागेल. लॉगबुक सर्व नोदींची अद्यावत ठेवणेची जबाबदारी संबंधीत टँकर चालकाची राहील.टँकरचे लॉगबुक गहाळ झाल्यास त्या कालावधीचे बील अदा केल जाणार नाही. सदर लॉगबुकवरील नोंदी दररोज देवस्थानचे अधिकाऱ्यांमार्फत तपासून घेणे बंधनकारक असेल.

२३.	निवीदाधारकाने सादर केलेले दर हे निवीदा उघडण्याच्या दिनांकापासून ९० दिवसापर्यंत स्विकृतीस पात्र राहतील.

२४.	निवीदा फॉर्मच्या प्रत्येक पानावर निवीदीधारकाने किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीने स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

२५.	बयाणा रक्कम यासाठी कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

२६.	कोणतेही कारण न देता कोणतीही निवीदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा निवीदेतील अटी व शर्तीमध्ये पध्दती व प्रकारामध्ये बदल करण्याचा अधिकार संस्थानने राखून ठेवला आहे.

२७.	सदरील निवीदा प्रकियेबाबत काही वाद निर्माण झाल्यास पाथर्डी न्यायकक्षेअंतर्गत राहील.

२८. या निवीदा प्रक्रियेमध्ये संस्थानाचा निर्णय अंतिम राहील. तो सर्व निवीदाधारकांवर बंधनकारक असेल.

**निविदाकाराची स्वाक्षरी**

**संपूर्ण नांव व पत्ता**

**स्वघोषणा पत्र - १**

प्रमाणित करणेत येते की, मी..... ..... ..... ..... ..... ..... ..... ..... ..... ..... ..

पत्ता ..... ..... ..... ..... ..... ..... .....माझ्या मालकीचे खालील प्रमाणे ट्रक / टँकर आहेत.

| नं. | टँकर / ट्रक क्रमांक | टँकर / ट्रक मालकाचे नांव | टँकरचे वजन भरलेले असतांना (काटापावती) | टँकर रिकामे वजन ( काटा पावतीनुसार) | निव्वळ वजन |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |
| ७ | | | | | |

उपरोक्त सर्व ट्रक / टँकरचा रोड टॅक्स, इंशुरन्स, फिटनेस, परमिट नोंदणी प्रमाणपत्र, पी.यु.सी., मोटार वाहन कर व व्यवसाय कर इत्यादी आज मितीस भरलेले आहेत. सोबत सर्व ट्रक / टँकरची कागदपत्रे स्वसाक्षांकित जोडलेले आहेत.

**टँक / टँकर मालकाची सही**

**नांव**

**टँकर मालकाने संस्थेशी करावयाचा करारनामा ( रू.१००/- च स्टॅम्प पेपरवर )**

प्रमाणित करण्यात येते की, ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... मला श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे संस्थानचे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याचे कत्राट मिळाल्यास मी सदर संस्थेस माझे स्वतःच्या मालकीचे खालील नमूद केलेल्या क्रमांकाचे टँकर्स / ट्रक टंचाई कालावधी संपेपर्यंत यापैकी जो कालावधी अगोदर घडेल तो पर्यंत किंवा वाढीव कालावधीसाठी संस्थानास पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेस टँकर उपलब्ध करून देणेस खालील नमूद केलेल्या अटी शर्तीस अधिन राहून करार करीत आहे.

| नं. | टॅकर्स / ट्रक क्रमांक | टँकरची वहन क्षमता ( मे.टनामध्ये) |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |

अटी / शर्ती

१. या कराराचा कालावधी दि. १० सप्टेंबर२०२६ते पुढील आदेशापर्यंत किंवा टंचाई कालावधी संपेपर्यंत यापैकी जो कालावधी अगोदर घडेल तो पर्यंत राहील.

२. माझे मालकीचे उपरोक्त क्रमाकांचे ट्रक / टँकर टंचाई कालावधीमध्ये पिण्याचे पाणी वाहतुक करणेकामी लावावयाची आहे. त्यासाठी मी परवाना धारक चालकांची नेमणूक केली असून त्याचेकडून काही अपघात घडलेस त्याची सर्वस्वी जबाबदारी माझेवर राहील, त्याची तोषीस संस्थेला लागू देणार नाही.

३. मासिक भाडे पुर्ण महिनाभर न केलेस प्रो रेटा बेसीस प्रमाणे झालेल्या पूर्ण दिवसाप्रमाणे अदा करणेत येईल. (म्हणजे मासिक भाडे भागिले कामाचे दिवस याप्रमाणे )

४. माझे ट्रक / टँकर वाहन चालक, क्लिनर व मी स्वतः नेमून त्यांना वेतन व भत्ता खर्च स्वतः अदा करील.

५. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशानुसार मी संस्थानास ( देवीगड, वसतीगृह, रेणुका विद्यालय, श्री महादेव मंदिर जुने मोहटे, तारकेश्वर गड रोड वृक्षसंवर्धन करिता ) येथे पिण्याचे पाणी वाहतूक विना तक्रार वाहतूक काम करील.

६. पाणी भराई पॉईट देवस्थान सांगेल त्याप्रमाणे असेल. भराईचा खर्च देवस्थानमार्फत अदा केला जाईल.

७. एक दिवसांत दोन खेपा न केल्यास फक्त केलेल्या खेपेचा दिवसाचे भाड्याची अर्धी रक्कम अदा केली जाईल हे मान्य राहील.

८. पाणी वाहतूक करतांना माझे ट्रक / टँकरचा विमा उतरविलेला असून टॅक्स, परमिट, पासींग सर्व पूर्ण मुदतीतील आहे व राहील.त्याबाबतची जबाबदारी माझेवर राहील. त्यामुळे होणारे नुकसानीची सर्वस्वी जबाबदारी माझेवर राहील. देवस्थानास कोणतीही तोषीस लागू देणार नाही.

९. पाणी वाहतूक कामाचे पेमेंट संस्थेकडून नियमाप्रमाणे जे मिळेल ते मला मान्य आहे.

१०. पाणी वाहतूक काम करित असतांना विना अपघात काम करणे माझेवर बंधनकारक राहील. त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी माझेवर राहील. अपघात घडल्यास त्यासाठी मी व माझा ट्रक / टँकर चाल जबाबदार आहे. त्यासाठी देवस्थान जबाबदार राहणार नाही.

११. पाणी वाहतूक काम करतांना लॉगबुक पाणी पुरवठा विभागाच्या सह्या घेवून लेखा विभागाकडे देणे व सदर लागॅबुक झेरॉक्स पाणी पोहोच पावतीसह दोन प्रति सादर करणे माझेवर बंधनकारक राहील. त्याशिवाय वाहतूक पेमेंट मिळणार नाही. याची मला जाणीव आहे.

१२. पाणी वाहतुक काम करतांना ट्रक / टॅंकर नादुरूस्त झाल्यास त्वरीत दुरूस्त करून पाणी वाहतुक खंडीत होणार नाही याची दक्षता घेईल त्याची जबाबदारी माझेवर राहील.

१३. माझे ट्रक / टँकरवर बसविलेल्या टाक्या गळक्या राहणार नाही याची दक्षता घेईल. तसेच टाक्या अपघाताने फुटल्यास त्याची जबाबदारी माझेवर राहील. योग्य झाकण लावले जाईल.

१४. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशानुसार पाणी पुरविण्याबाबत दिलेले काम / खेपा पूर्ण करण्याची दक्षता घेईल.

१५. ट्रक / टँकर ज्यादिवशी प्रत्यक्ष खेपा करण्यास सुरूवात होईल त्या दिवसापासून खेपाचे भाडे मला मिळेल याची मला जाणीव आहे.डिझेल स्वतः मी भरावयाचे आहे हे मला मान्य आहे.

१६. कामापोटी मी आगाऊ रक्कमेची मागणी करणार नाही.

१७. पाणी वाहतूक करित असतांना लागणारे इंधन ( डिझेल ) मी पुरवायचे आहे. मात्र प्रति किमी प्रमाणे इंधनभार मान्यतेप्रमाणे देवस्थानल मला बिलाप्रमाणे देईल, इंधन सांडणे, चोरी जाणे इ.इ.बाबत कोणतीही भरपाई दिली जाणार नाही.

१८. ट्रक / टँकर पूर्ण टंचाई संपेपर्यंत चालू ठेवून मध्येच ट्रक / टँकर पाणी वाहतुकीचे कामावरून माझेमुळे बंद झाल्यास देवस्थानच्या नियमानूसार नुकसान भरपाई म्हणून जी जास्तीची रक्कम राहील ती माझे बिलातून वसुल करण्यास माझी हरकत राहणार नाही.

१९. टँकरमधील पाणी इतरांना विकणार अथवा इतरांना देणार नाही किंवा स्वतःचे फायद्याकरिता वापर करणार नाही.

**वाहन (टँकर / ट्रक ) मालकाची सही**

**नांव**

**निविदेतील अटी शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र**

मी..................................................................................याव्दारे शपथेवर निवेदन करतो की, मी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे संस्थेला देवीगड, वसतीगृह, रेणुका विद्यालय इत्यादी यांना पिण्याचे पाण्याचे टंचाई अंतर्गत दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी काढलेल्या पिण्याचे पाणी वाहतुकीचे निविदेतील अटी व शर्ती पूर्णपणे वाचून समजावून घेतलेल्या आहेत. पिण्याचे पाणी वाहतूक निविदेतील अटी आणि शर्ती मला मंजूर असून त्या अटी व शर्तीचे मी पूर्णपणे पालन करील.

मी असेही शपथेवर निवेदन करतो की, पिण्याच्या पाण्याची टंचाईही अतिसंवेदनशील बाब असल्याचे मला मान्य आहे. करारनाम्याच्या आधारे इंधनासह वाहने पुरविल. करार केलेल्या वाहनांचा ट्रक/ टँकरसंबंधी रोड टॅक्स, इन्शुरन्स, फिटनेस, परमिट, नोंदणी प्रमाणपत्र,पी.यु.सी., व्यवसाय कर इत्यादी वेळोवेळी शासनाच्या नियमांनुसार पूर्तता करील.

वरील मजकूर माझे माहितीप्रमाणे खरा व सत्य आहे. मी आवश्यकतेप्रमाणे वाहने न पुरविल्यास निविदेत नमूद केलेल्या अटी आणि शर्तीनूसार दंडणीय कार्यवाहीस पात्र राहील. तसेच टँकर / वाहने न पुरविल्यास मी भा.द.वि.कलम १९९ व २०० प्रमाणे शिक्षेस पात्र राहील. सदर मजकूर मी आज दि. /     / २०२६ रोजी मुक्कामी प्रामाणित केलेला आहे.

दि.    /    / २०२६

स्थळ :-

**निविदाधारक यांची स्वाक्षरी**

**संपूर्ण नांव व पत्ता**

# टँकरव्दारे पिण्याचे पाणी वाहतूक करणेबाबतची निविदा

( सन २०२६ )

प्रति,

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी**

श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट,मोहटे

ता.पाथर्डी, जि.अहमदनगर

महोदय,

निविदेमधील अटी व शर्ती मी वाचल्या असून पिण्याचे पाणी वाहतूक करणेसाठीचे निविदेचे अनुषंगाने खालीलप्रमाणे दर सादर करीत आहे.

| नं. | तपशील | |
|---|---|---|
| १. | टँकर मालकाचे नांव | |
| २. | पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता | |
| ३. | मोबाईल नं. | |
| ४. | बँक खाते नांव ( | |
| | शाखा | |
| | खाते नंबर व प्रकार | |
| | आयएफएससी कोड | |
| ५. | आधार क्रमांक ( फोटो कॉपी जोडणे) | |
| ६. | पॅन कार्ड ( फोटोकॉपी जोडणे) | |
| ७. | कामाचा अनुभव ( प्रमाणपत्र जोडणे ) | |
| ८. | इतर आवश्यक माहिती | |
| | | |
| | | |

## वाहनांचा आवश्यक प्रति खेप प्रति टनाकरिता दर खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव | **वाहनाचा १ मेट्रीक टन वाहतुकचे दराबाबत तपशिल** | |
|---|---|---|---|
| | | १ मे. टन एककामध्ये ( युनिट) क्षमतेसाठी | |
| | | प्रति दिनभाडे ( रूपये ) | प्रति कि.मी.भाडे ( रूपये) |
| | | | |
| | एकत्रित मासिक भाडे रू. | | |

निवीदा फॉर्मचे सोबत जोडलेले सर्व नियम व अटी मी पूर्णपणे वाचल्या असून, त्या मला मान्य व बंधनकारक राहतील.

दिनांक / / २०२६

स्थळ :-

**पुरवठादार यांचे संपुर्ण नांव व पत्ता**

________________________________________

________________________________________

________________________________________

**पुरवठादार स्वाक्षरी**

------------------------------------------------------